महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005


DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


क्रमांक : पुविमं / पी–2 / उ.मा. / 4711
पुणे–४११००५
दिनांकः– 09 / 08 / 2023
10/8

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर / सोलापूर.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा प्रात्यक्षिक परीक्षेतील गैरप्रकाराबाबत.....
संदर्भ– 1. मा.स्वीय सहाय्यक, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा यांचे कार्यालयाकडून क.मंत्री / शा.शि.म.शा. / जनरल / 1844 / 2023 दि.03.03.2023 चे पत्र.
2. क.रा.मं. / परीक्षा–2 / 3287 पुणे–04 दि.26.07.2023 चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) प्रात्यक्षिक परीक्षेत सर्वच ठिकाणी मोठया प्रमाणात गैरप्रकार घडून येत आहेत. इ.11 वी व इ.12 वी च्या तुकडया बंद पडू नये म्हणून फक्त दाखले गोळा करुन कॅटलॉगला विदयार्थी संख्या दाखवली जाते. व वर्षभर बोगस हजेरी लावली जाते. कला शाखेत 20 टक्के विदयार्थी वर्षभर एकही दिवस विदयालयात येत नाहीत. कोणतीही चाचणी, प्रात्यक्षिक न देता त्यांना उत्तीर्ण करुन 12 वी मध्ये प्रवेश दिला जातो. इ.12 वी मध्येही कॉलेजला आल्यानंतर विदयार्थी वर्षभर उपस्थित राहत नाही. कोणतीही परीक्षा देत नाही. बोर्डाचा परीक्षेचा फॉर्म भरतात. प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांची संपूर्ण हजेरी लावण्यात येते. इ. 12 वी बोर्ड परीक्षेचा प्रात्यक्षिक परीक्षेचा पेपर देत नाही, तोंडी परीक्षेलाही उपस्थित राहत नाही तरी सुध्दा प्राचार्यांच्या सांगण्यानुसार विदयालयाचा व विषयाचा निकाल चांगला लागावा म्हणून अशा विदयार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण दिले जातात. ही मूल्यमापन पध्दती बंद व्हावी. नाईलाजाने शिक्षकांना बोगस गुण द्यावे लागतात. यामुळे शिक्षकांची कुचंबना थांबवावी. शिक्षण क्षेत्रातील या गैरप्रकाराला आळा बसावा यासाठी त्वरीत उपाययोजना करावी. असे तक्रारदाराने संदर्भिय पत्रात नमूद केले आहे.

तरी याबाबत कोणतीही तक्रार असल्यास मंडळास उलट टपाली अवगत करण्यात यावे. अन्यथा होणा–या कार्यवाहीस कनिष्ठ महाविदयालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–४११००५